# जिल्हा परिषद नाशिक (सामान्य प्रशासन विभाग)
## निविदा सुचना

**कामाचे नांव :-** राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान अंतर्गत नाशिक जिल्हा परिषदे मार्फत जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे पाच दिवसीय निवासी प्रशिक्षण दिनांक ७/७/२०१४ ते १५/८/२०१४ या कालावधीत आयोजित करणेसाठी इव्हेंट मॅनेजमेंट ऑर्गनायझरची नेमणुक करणे बाबत...

**अंदाजित रक्कम रु.२,४५,०००/-**

**कामाच्या अटी व शर्ती :-**

१) अंदाजपत्रकात समाविष्ठ बाबींचा तपशिल सोबत जोडल्या शेडयुल "ब" प्रमाणे आहे.

२) प्रशिक्षणातील एका सत्रात अंदाजे ३० ते ४० कर्मचारी सहभागी होण्याचे नियोजित आहे.

३) निविदा भरता निविदेच्या १% रक्कम रु.२५००/- (अक्षरी रक्कम रु.दोन हजार पाचशे मात्र) चा इसारा रक्कमेचा डी.डी. **"मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक"** यांचे नावे द्यावा लागेल.

४) या कामासाठी आवश्यक ते परवाने घेण्याची जबाबदारी निविदा धारकावर राहिल. यासाठी आवश्यक व अधिकृत रक्कमेचा भरणा विभागा मार्फत करण्यात येतील.

५) निविदेतील दर हे सर्व करासहीत असतील, या दराशिवाय अन्य कोणतेही शुल्क अनुज्ञेय राहणार नाही.

६) निविदेमध्ये पुढील प्रमाणे नमुद केलेल्या बाबीचा सेवापुरवठा पुरविणेत यावा.

(अ) प्रशिक्षणार्थी निवास व्यवस्था संभाव्य ४० प्रशिक्षणार्थीसाठी (चार दिवस)

(ब) सकाळी ९.०० वा.चहा, नाष्टा, सकाळी ११.३० वाजता चहा व बिस्किटे, दुपारी १.३० ते २.०० वा. भोजन व्यवस्था, सायंकाळी ४.०० वाजता चहा व बिस्किटे, व सायंकाळी ८.०० ते ८.३० वाजता भोजन. तसेच पाचव्या दिवशी दोन वेळेस चहा, नाश्ता, व दुपारचे जेवण व्यवस्था.

(क) ४० प्रशिक्षणार्थी आसन व्यवस्था असलेला प्रशिक्षण कक्ष, एल.सी.डी. प्रोजेक्टर, साऊंन्ड सिस्टम, व्हाईट बोर्ड मार्कर पेनसह, इ.

७) काम मुदतीत न केल्यास अथवा असमाधानकारक केल्यास सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.

८) काम पुर्ण झाल्यावर देयकातुन नियमाप्रमाणे आयकर कपात करण्यात येईल.

९) अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे कामाचे परिमाण प्रत्यक्षात कमी जास्त होऊ शकते, त्यानुसार देयक अदा करण्यात येईल.

१०) कोणतेही कारण न दर्शविता निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा परिषद, नाशिक राखुन ठेवत आहे.

११) कोणत्याही प्रकारच्या अटी व शर्ती असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

१२) कोरे निविदा फॉर्म पोष्टाने पाठविले जाणार नाही अगर स्विकारले जाणार नाही.

१३) निविदा धारक यांनी करावयाचे कामासह सादरीकरणासह दर नमुद करणे अनिवार्य आहे, निविदा धारक यांनी सदर कामाचे केलेले सादरीकरण व निविदेतुन नमुद केलेले दर यांचा एकत्रित विचार करुन पुरवठादाराची निवड अंतिम करण्यात येईल.

१४) आवश्यकतेनुसार दिलेल्या आराखडयात बदल करण्याचा अधिकार जिल्हा परिषद नाशिक राखुन ठेवत आहे.

१५) प्रिबीड मिटींग दिनांक ३०/०६/२०१४ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे दालनात सकाळी १०.०० वाजता ठेवण्यात येईल. प्रिबीड मिटींग मध्ये उर्वरित निविदेविषयक अटी व शर्ती, भोजनाचे मेनु, निवासाचे स्वरुप, आदी बाबींवर चर्चा करण्यात येईल.

१६) उक्त निविदेची सेवा पुरवठा ही तात्काळ सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षा करीता अंमलबजावणी करावयाची असल्याने, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडून सदरची सेवा प्राप्त करुन घेण्या करीता निविदा प्रक्रियेत १ पात्र निविदा जरी आली तरी निविदा अंतिम करण्यात येईल. निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार हे जिल्हा परिषद, नाशिक राखुन ठेवत आहे.

१७) जिल्हा परिषद नाशिक हे सक्षम प्राधिकारी निविदा निश्चित झाल्यानंतर प्रत्यक्षात न्युनतम देकार प्राप्त संस्थेची प्रत्यक्षात पाहणी करुन सेवा पुरवठादार संस्था प्रशिक्षणासाठी व निवासासाठी सक्षम असल्याची खात्री झाल्यावरच निविदा अंतिम करण्यात येऊन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात येतील.

१८) सदरची निविदेची अंदाजित रक्कम ही ५ दिवसाचे एका सत्रा करीता असुन, उर्वरित सत्रा करीता सदर निविदा लागु राहिल.

१९) एका वेळी एक पेक्षा अधिक सत्र घ्यावयाचे असल्यास, पुरवठा दारास निविदेतील मंजुर केलेल्या दरा प्रमाणेच सेवा द्यावी लागेल.

२०) सदर निविदा स्विकृत झालेल्या पुरवठादाराकडून उत्तम प्रतीची सेवा दिल्यास, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील २० संभाव्य प्रशिक्षणासाठी मार्च २०१५ पावेतो पुरवठा आदेश देणेत येईल.

२१) निविदा कालावधी तपशिल पुढील प्रमाणे.

निविदा स्थळावर निविदा उपलब्ध दिनांक :- २७/०६/२०१४ ते ०३/०७/२०१४.
प्रिबिड मिटींग :- दिनांक ३०/६/२०१४ सकाळी १०.०० वाजता.
(स्थळ :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे दालनात)
निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर करणेचा दिनांक ३०/६/२०१४ वेळ दुपारी १२.०० ते ३/७/२०१४ दुपारी १५.००, निविदा फी, बयाणा रक्कमेचा धनाकर्ष जमा करणेचा दिनांक ४/७/२०१४ वेळ सकाळी १०.०० ते दुपारी १३.०० वाजेपर्यंत निविदा उघडण्याचा दिनांक ४/७/२०१४ दुपारी १४.०० वाजता.

सदरची निविदा https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**निविदा :- ई-निविदा पध्दतीने ऑनलाईन ने स्विकारली जाईल.**

**स्वाक्षरी /- xxx**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**स्वाक्षरी /- xxx**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**